कोर्ट विद्य. संतोष खांडरे तहसिलदार हिंगणा यांचे न्यायालय

रा मा.क्रं.०१/एन.ए.पी–३४/२०२०–२१

मौजा– हिंगणा प.ह.नं. ४९

विषय :- महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ व अन्वये निवासी अकृषक वापर स्विकारण्याबाबत व अकृषक वापर परवानगी देणेबाबत.

१) अर्जदार श्री. शशिकांत दशरथ थोटे रा. वानाडोंगरी ता. हिंगणा जि. नागपूर यांचा अर्ज दिनांक २२.०७.२०२०

२) महाराष्ट्र शासन राजपत्र असाधारण भाग चार दिनांक ५ जानेवारी २०१७

३) मुख्याधिकारी नगर पंचायत हिंगणा यांचे पत्र क्र. नपहि/गांध/कावी–क्यु /२०१९–२० दि. १८.०३.२०२०

४) तलाठी सा.क्र ४९ याचा अहवाल दिनांक ०३ . ०८ .२०२०

आदेश दिनांक

(०६ / ०८ /२०२०)

अर्जदार श्री. शशिकांत दशरथ थोटे रा. वानाडोंगरी ता. हिंगणा जि. नागपूर यांनी संदर्भिय पत्र क्र १ अन्वये मौजा हिंगणा तहसिल हिंगणा, जिल्हा नागपूर पहन– ४९ येथील त्याच्या भोगवटयातील शेत स.न. ६२ आराजी १.३० हे.आर. एकुण (१३००० चौ.मी.) च्या कृषक जमिनीच्या निवासी प्रयोजनार्थ अकृषक सारा शासन खजिन्यात जमा करण्याकरीता व अंतिम विकास आराखडयाप्रमाणे अकृषक वापर परवानगी करीता या कार्यालयाकडे अर्ज सादर केलेला आहे.

संदर्भिय पत्र क्र २ अन्वये महाराष्ट्र जमीन महसूल संहिता १९६६ चे कलम ४२ व ४२ अ मध्ये सुधारणा करुन शासनाने ५ जानेवारी २०१७ अधिसुचना द्वारे कलम ४२ ब व ४२ क अंतर्भुत करून अंतिम विकास योजनेमध्ये दर्शविलेल्या वापर विभागानुसार त्याअंतर्गत जमिनीच्या अकृषिक वापराकरिता मानीव रूपांतर यावयाची तरतूद करण्यात आली आहे. व पोटकलम (२) मध्ये तरतूद केल्याप्रमाणे रूपांतर कर, अकृषक आकारणी आणि लागू असेल तेथे नजराणा किंवा अधिमुल्य, किंना इतर शासकीय देणी यांचा भरणा केला असेल तर अशया क्षेत्रात समाविष्ट असलेल्या कोणत्याही जमिनीचा वापर हा, अशया विकास योजनेतील लाटप आरक्षण किंवा निर्देशन या स्वरूपात दर्शविलेल्या वापरात रूपांतरीत करण्यात आले असल्याचे मानण्यात येईल आणि अशा विकास योजनेनुसार अनुज्ञेय असलेल्या वापराकरिता कलम ४२ किंवा कलम ४८ अन्वये इतर कोणताही स्वतंत्र परवानगी घेण्याची आवश्यकता असणार नाही.

Scanned with CamScanner

अर्जदार यांच्यातर्फे खालील अटीच्या आधारे निवासी अकृषक सारा शासन खजिन्यात जमा करण्यात येईल.

१) अर्जदार यांनी नियोजन प्राधिकरण यांचेकडून अभिन्यास मंजूर करून घेणे बंधनकारक राहील.

२) बांधकाम करण्यापूर्वी संबंधित नियोजन प्राधिकरण यांचेकडून परवानगी घ्यावी लागेल.

३) उक्त जागेवर मंजूर विकास नियंत्रण नियमावलीतील तरतुदीनुसार वार्षिक मुल्यवापराच्या १५ टक्के अधिमुल्य प्राधिकरणाकडे भरल्यानंतरच विनियम निवासी वापर अनुदेय करता येईल.

४) प्रस्तावित ठिकाणी किमान १२.०० मी. रुंद पोच रस्ता आवश्यक राहील.

५) सनद मंजुरीपश्चात तहसिल कार्यालयाकडून सनद प्राप्त करून घेणे बंधनकारक राहील.

६) अर्जदार यांनी मौक्यावर बांधकाम सुरू करण्यापूर्वी तहसिल कार्यालय येथे लेखी कळवावे व त्यानंतरच बांधकाम सुरू करावे. तसेच मंजूर अभिन्यासची एक प्रत या कार्यालयास सादर करावी.

उपरोक्त प्रमाणे जागेचे एकूण क्षेत्रफळ १३००० चौ.मी. अकृषक सारा आकरणी करावयाचे क्षेत्र म्हणजेच १३००० चौ.मी यास ०.१० पैसे प्रती चौ.मी. या प्रमाणे अकृषक महसूल कर रू. १३००/- ग्रामपंचायत सेस कर अकृषक कराएवढा रू. १३००/- जिल्हापरिषद सेस सारा ७ पट अकृषक कराच्या रू. ९१००/- परावर्तीत कर अकृषक सा-याच्या ५ पट म्हणजेच रू. ६५००/- असे एकुण रू. १८२००/- चालान क्र. २९२८८३८ दिनांक ०६ / ०८ /२०२० अन्वये शासन खजिना जमा करण्यात आलेले असून अर्जदार यांना अटी व शर्तीच्या आधारे निवासी अकृषक आकारणी करण्याचा आदेश देण्यात येत आहे.

तहसिलदार हिंगणा

(संतोष खांडरे)
तहसिलदार, हिंगणा

प्रतिलीपी:-

१) मा. जिल्हाधिकारी, नागपूर यांना माहितीस सविनय सादर.

२) मा. उपविभागीय अधिकारी, नागपूर (ग्रा.) यांना माहितीस सविनय सादर.

३) मा. उपसंचालक, नगर रचना, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांना माहितो व आवश्यक कार्यवाहीस्तव.

४) मौजा रा.क्र. ८९ मौजा हिंगणा यांना आवश्यक कार्यवाहीस अग्रेषीत.

५) दुय्यम निबंधक, तहसिल हिंगणा यांना माहितीस अग्रेषित.

६) अर्जदार श्री. शशिकांत दशरथ घोटे रा. धानाडोंगरी ता. हिंगणा जि. नागपूर यांना माहितीस अग्रेषित.

06/08/2020
तहसिलदार, हिंगणा

Scanned with CamScanner